**नियमित दिवाणी दावा क्र. १४०/२०१६**
**कलावती वि. दत्तात्रय**
**नि.क्र. ४१ पुढे**

**वादीतर्फे साक्षीदार क्र.१ नामे कलावती तुळशीराम बारणे यांचा शपथेवर पुढील उलटतपास प्रतिवादी विधीज्ञ श्री. के. एस. गाडे यांचेमार्फत नि.क्र. ५१ वरील आदेशास अनुसरून :-**

**१४.** हे म्हणणे खरे आहे की, माझे पती तुळशीराम यांना माझ्या व्यतिरिक्त दुसरी एक पत्नी आहे. हे म्हणणे खरे आहे की, तुळशीराम यांची दुसरी पत्नी नामे धनाबाई हिचेपासुन प्रतिवादी दत्तात्रय व मुलगी मंगल ही अपत्य आहेत. हे म्हणणे खरे आहे की, धनाबाई ही मयत आहे व मुलगी मंगल हिचे लग्न झाले असुन ती सासरी आहे. मला रविंद्र व विश्वनाथ अशी दोन मुले आहेत व ते विवाहित आहेत.

**१५**. हे म्हणणे खरे आहे की, माझे पती तुळशीराम यांचे वडील मल्हारी नामदेव बारणे हे मयत आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मल्हारी बारणे यांना चार मुले नामे सुदाम, लक्ष्मण, तुळशीराम व ज्ञानेश्वर होते व दोन मुली नामे धृपदाबाई व सरस्वती अशी आहेत. धृपदाबाई शांताराम तापकीर ही मयत आहे तर सरस्वती उत्तम जाधव ही हयात आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीत धृपदाबाई व सरस्वती यांचा सुध्दा सहहिस्सा आहे व त्यांना आवश्यक पक्षकार म्हणून प्रस्तुत दाव्यात जोडलेले नाही.

**१६**. हे म्हणणे खरे आहे की, मल्हारी यांचे चारही मुले ही आज मयत आहेत. ज्ञानेश्वर मल्हारी बारणे यांची अपत्यांची नावे स्वाती मनोहर पिसे, मनिषा गनपुले, कांचन, राणी व मुलगा नामे संतोष असे आहेत. सदर चारही ज्ञानेश्वर बारणे यांच्या मुलींना आवश्यक पक्षकार म्हणून प्रस्तुत दाव्यात जोडलेले नाही.

**उलटतपास तहकूब ...**

श्रवणोत्तर स्वीकृत,
sd/-
(मा.गो.मोरे)
**सह दिवाणी न्यायाधिश क. स्तर,**
**पिंपरी, पुणे.**

पिंपरी, पुणे
दिनांक :- ०८/१०/२०२४